# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 11/11/2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिरजगाव कसबा 387 / 23 कलम 279,304 (अ) भादंवी | पोहेकॉ रवि बहादुरे ब.नं. 583 पोंस्टे शिरजगाव कसबा | अज्ञात | बहिरम रोड नवीन टोल नाका 12 किमी उत्तर | 21 / 10 / 23 चे 03 / 30 वा | 10 / 11 / 23 चे 19 / 01 वा | हकीकत अशा प्रकारे आहे पोहेकॉ रवि बहादुरे ब.नं. 583 पोस्टे शिरजगाव कसबा यांनी नियंत्रण कक्ष अमरावती ग्रामिण येथुन मर्ग नं. 00 / 2023 कलम 174 जाफो मधील मृतक एक अनोळखी इसम वय अदाजे 40 वर्ष याचा बहिरम रोड नवीन टोल नाका पोस्टे शिरजगाव क हददीमध्ये रात्री 03 / 30 वा अज्ञात आरोपी वाहन चालक याने आपले वाहन भरधाव वेगाने व निश्काळजी पणाने चालवुन अनोळखी मृतक यास धडक देवुन अपघात घडवुन आणला त्यामध्ये अनोळखी मृतक याचा इलाजा दरम्यान ईर्विन दवाखाना येथे दिनांक 01 / 11 / 2023 रोजी मृत्यु झाला अशा आशयाची मर्ग डायरी पोस्टेला आणुन दाखल केल्याने पोस्टे शिरजगाव येथे अपराध नं. 387 / 2023 कलम 279, 304 (अ) भादंवी प्रमाने दाखल करून तपासात घेतला. |
| 3 | मोर्शी 547/23 कलम 379 भा द वी | मनोहर मुकुंदराव उपासे राहणार हिवरखेड ता मोर्शी | अज्ञात | हिवरखेड मोर्शी | 01/11/23 चे 19:00 वा ते 06/00 वा दरम्यान | 10/11/23 चे 16:17 वा दरम्यान | फिर्यादी याची मोसा क्रमांक MH 27 AS 0670 ही घरासमोर उभी केली असता दिनांक 1/11 /2023 रोजी सकाळी 6/00 वा कोणीतरी अज्ञाताने चोरून नेली. |
| 4 | वरुड 719/23 कलम 324 ,323,352 ,504,506, 34 भा द वी. | रमेश महादेवराव कांबळे वय 63 रा जरुड ता वरुड | (1)प्रदीप मधुकर चरपे वय 28. (2) राहुल मधुकर चरपे वय 30. (3 )सौ सुनीता मधुकर चरपे वय 45. जात माळी सर्व रा जरूड ता वरुड | जरूड 05 किमी पश्चिम | 10/11/23 चे 19/20 वा दरम्यान | 10/11/23 चे 22/29वा. | फिर्यादी व आरोपी हे शेजारी शेजारी राहतात यातील आरोपी क्र 1.याने फिर्यादीच्या घरासमोर फटाका फोडला त्यामुळे फटाक्याची चिंगारी ही फिर्यादीच्या घरात आली फि.ने आरोपीस म्हटले की ही फटाके फोडण्याची जागा नाही माझ्या घरासमोर फटाके फोडू नको असे म्हणतात आरोपी क्र.03 सुनीता ही हातात लाकडी काठी घेऊन आली तिने हातातली काठी फिर्यादी याच्या डाव्या हाताच्या ढोपरा जवळ मारली त्यामुळे रक्त निघू लागले तसेच आरोपी क्र. 02 ने डोक्यावर मारले यातील आरोपी त्यांनी संगतमत करून फिर्यादी यांच्या डोक्यावर डाव्या डोळ्याचे खाली गालावर पाठीवर मारले व जीवे मारण्याची धमकी दिली. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | बेनोडा 242/2023 कलम 363 भादवी | वय 40 वर्ष | अज्ञात | ग्राम मिर्झापूर | 08/11/023 चे सकाळी 07.00 वा. | 10/11/2023 चे 21.31 वा. | फिर्यादीची मुलगी कु. वय 17 वर्ष हि शाळेत जातो म्हणुन घरुन गेली परंतु अद्याप पर्यत घरी आली नाही. तिचा आज पावेतो शोध घेतला मिळुन आली नाही तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 6 | शेघाट 422/23 कलम 363 भा.द.वि | ग.भा.अरुणा दिनेश मसराम वय 40 वर्षे रा धनोडी | अज्ञात | ग्राम धनोडी | 09/11/23 चे 09/30वा दरम्यान | 10/11/23 चे 02/25वा. | फिर्यादी हिची मुलगी कुमारी वय 15 वर्षे ही फिर्यादीची मोठी मुलगी व भाची हिच्या सोबत कामाला वरुड येथे गेली होती फिर्यादीची मोठी मुलगी ही कामावरून रात्री 08/00वा घरी परत आली परंतु ती परत आली नाही फिर्यादीने अंकिता व फिर्यादीची भाची हिला ती - कुठे आहे विचारले असता त्यांनी सांगितले की तिला मजुरीचे पैसे भेटल्याने ती कपडे घेऊन घरी परत येते असे तीने त्यांना म्हटले होते परंतु फिर्यादीची मुलगी रात्री उशिरापर्यंत घरी आली नाही नातेवाईकाकडे शोध घेतला मिळून आली नाही फि.मुलगी कुमारी 15 वर्षे तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळून नेले असावे. |
| 7 | दत्तापूर 590/2023 कलम 354 (ड) भादवी | आरती जयपाल बांते वय 29 वर्ष रा नवरंग चौक धामणगाव रेल्वे | अविनाश लांजेवार वय 29 वर्ष रा विरुळ रोंघे तालुका धामणगाव रेल्वे | नवरंग चौक धामणगाव रेल्वे 02 किमी उत्तर | 06/11/23 चे 11:00 वा. ते 10/11/23 चे 14/00 वा | 11/11/23 चे 20:14वा. | यातील फी ही कामगार संघटना कार्यालय दत्तापुर येथे ऑपरेटर म्हणून काम पाहते यातील आरोपी याने कार्यालयाचे बोर्ड वरून फी चा मोबाईल नबर घेऊन फिस फेसबुकवर व व्हाट्सअप वर मॅसेज करून त्रास देत होता. तसेच फि ने आरोपीचा नंबर ब्लॉक केला असता आरोपी ने फि चा ऑफिस टाईम मध्ये पाठ लाग केला व नमूद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फीच्या व्हाट्सअप वर व्हिडिओ कॉल केला व मॅसेज केला की माझे सोबत दिवाळीची खरेदी करण्यासाठी चल. असे बोलून त्रास दिला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 8 | चांदुररेल्वे 532/23 कलम 324,504, 506 IPC | शेख सरदार शेख अब्दुल्ला वय 65 वर्षे डांगरीपुरा चांदुररेल्वे | शेख सोहेल शेख साबीर वय 40 वर्ष राहणार डांगरी पुरा चांदुररेल्वे, | डांगरीपुरा चांदुर रेल्वे | 09/11/23 चे 15/00, | 10/11/23 चे 22/19वा, | फिर्यादी व आरोपींच्या जागेवरून वाद झाला. वरून आरोपी ने जमिनीवर पडले असलेले लाकडी चौकोनी रॅप्टर उचलून फिर्यादीचे डोक्यावर मारले. फिर्यादीचे डोके फुटून रक्त निघाले. वरून गुन्हा दाखल. करून तपासात घेतला |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | कु–हा 354/23 कलम 324, 504, 506 IPC | देवचंद मधुकर धांडे व 39 वर्षे राहणार वरा तालुका तिवसा | किसन वसंतराव भगोले वय 45 रा. वरा | ग्राम वरा 8 | 10/11/23 चे रात्री 08/00वाजता दरम्यान | 10/11/23 23/09 | यातील आरोपी आणि फिर्यादी हे एकाच गावातील राहणारे असून एकाच मोहल्ल्यात राहतात घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे फिर्यादीच्या घरासमोर बसले असता त्या ठिकाणी आरोपी हा त्या ठिकाणी दारू पिऊन आला तेव्हा आरोपीने फिर्यादीला म्हटले की तुम्ही दारू पिली आहे घरी जा तर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली तो तिथून त्याच्या घरी गेला व मारण्यासाठी गवंडी कामावर वापरण्याची ॲल्युमिनियमची बॉटम आणली व फिर्यादीचे डोक्यावर डाव्या साईडने मारून जखमी केले. |
| 10 | दर्यापूर 618/023 कलम 326, 498अ, 504,506,34 भादवि, | सौ वय 30 वर्ष | 1,-गजानन हरिदास गुरव,<br>2 हरिदास गंगाराम गुरव<br>3, सौ प्रमिला हरिदास गुरव तीन हि रा लेहगाव दाजीपूर शेतशिवार तालुका दर्यापूर जिल्हा अमरावती | लेहगाव दाजीपूर | 08/10/2023 चे12.00 | 10/11/2023 चे 17.02वा | आरोपी हे फिर्यादीला संगणमत करून घरगुती लहान सहान कारणा वरून शिवीगाळ करून व मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ करतात दि 08/11/2023 रोजी बचत गटाच्या किस्तीचे पैसे भरण्याच्या कारणा वरून आरोपी क्रमांक एक याने फिर्यादीच्या हातावर लाकडी काठीने मारहाण केली तसेच आरोपी क्रमांक दोन याने फि स शिवीगाळ करून तू येथून निघून जा असे म्हटले अशा फि च्या जबानी रिपोर्ट व मेडिसर्टी वरून गुन्हा नोंद करून तपासात घेतला |
| 11 | धारणी 671/023 कलम 324,504,506, 34 भादवी | राधेश्याम रणछोड डावर वय 43 वर्ष रा.केकदाखेडा ता. धारणी | 1. सुभाष छगन चव्हाण<br>2. श्रीराम सुभाष चव्हाण 3. प्रकाश सुभाष चव्हाण 4. अंकुश सुभाष चव्हाण<br>सर्व या.केकदाखेडा या.धारणी | ग्राम केकदाखेडा ता-धारणी | 09/11/2023 चे 17/30 ते 18/00 वा दरम्यान | 10/11/2023 चे 20/37वा. | यातील अर्जदार यांनी बकऱ्याच्या मटणाचे जेवण सर्व गावाला निमंत्रण देऊन जेवायला बोलाविले होते यातील गैर अर्जदार हे अर्जदाराच्या घरासमोरून जात असता अर्जदारास म्हटले की तू सर्व गावाला जेवायला बोलावले मला व माझ्या परिवाराला का बोलावले नाही या कारणावरून अर्जदारास गैरअर्जदार यांनी शिवीगाळ केली आणि आरोपी क्रमांक दोन,तीन,चार यांना बोलून यातील आरोपी क्रमांक दोन,याने त्याच्या हातात असलेल्या लाकडी काठीने दोन्ही पायावर व मांडीवर ,पाठीवर मारून जखमी केली व गैर अर्जदार तीन व चार ह्यांनी अर्जदारास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला . |

HC1498

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता